म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३९

# -मंजरी

सं.साव. १०३८
१८७३२
६२६८

के. नारायण काळे

REFBK-0004723
REFBK-0004723

आठ आणे.

# सहकार-मंजरी

के. नारायण काळे,
बी. ए. ऑ०

REFBK-0004723
REFBK-0004723

१९३२

आठ आणे

8623

प्रकाशक
केशव नारायण काळे
ठाणें

[ सर्व हक्क कर्त्याकडेच ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें नं. २.

नोंद नं. ६८८९
ठाणे
६-८-३२

# प्रस्तावना

पावसाळ्याच्या सुरुवातीस दक्षिण क्षितिजाच्या कडेनें ढगांचे थवे जसे सारखे बाहेर पडत राहून संपतां संपत नाहींत तसेच सध्यां मराठींत काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत. बऱ्याचशा काव्यसंग्रहांचे कर्ते हे प्रथमच लोकांपुढें आपापल्या काव्य-संग्रहाचे रूपानें आलेले असतात; परंतु प्रस्तुत काव्यसंग्रहाचे—सहकार-मंजरीचे कर्ते माझे मित्र श्री० के. ना. काळे हे आज चार-पांच वर्षें वाङ्मयाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतून लोकांपुढें वावरत असून त्यांचें नांव ललितवाङ्मयाच्या वाचकांना महशूर आहे. कोणत्याही विषयावर सुबोध, भारदस्त व सरस लिखाण करण्याचें त्यांचें सामर्थ्य जसें वाचकांच्या परिचयाचें आहे, तशीच गद्य व पद्य अशा दोन्ही माध्यमांवरील त्यांची अचुक पकडही त्यांच्या नित्य पाहण्यांतलीच आहे. तेव्हां 'सहकार-मंजरी' प्रसिद्ध करून श्री० काळे आपल्या प्रबंधकौशल्याची एखादी अदृष्ट व नवीन बाजू पुढें आणीत नसून त्यांनीं लोकांच्या मनांत वाढविलेल्या आशांची परिपूर्तता मात्र ते करीत आहेत.

श्री० काळे यांच्या या संग्रहांत एकंदर २७ कविता आहेत. त्यांतल्या बऱ्याच 'रत्नाकरां'त प्रसिद्ध झाल्या आहेत. बाकीच्या प्रथमच लोकांच्या नजरेस पडत आहेत. श्री० काळे यांच्या चांगल्यांपैकीं कांहीं कविता या संग्रहांत नाहींत याबद्दल माझ्याप्रमाणेंच त्यांच्या इतर परिचित वाचकांना वाईट वाटेल व कवीला त्याबद्दल क्षमा करणें जिवावर येईल.

या संग्रहांतील तीन कविता भाषांतरित आहेत व दोन मध्यवर्ति कल्पनेपुरत्या अनुवादात्मक आहेत. परंतु श्री० काळे यांची सुबोध, सरस, समर्पक व भारदस्त रचना ज्यांना ठाऊक आहे त्यांना या भाषांतरात्मक किंवा अनुवादात्मक कवितांचीही निराळी शिफारस करण्याची जरूर नाहीं. श्री०काळे यांनीं स्वतःच सांगितलेली जी उत्कृष्ट गीताची कसोटी—

**भाव अर्थ ध्वनि संग असे जेथें ।**
**गीत रंजवितें तेंच मन्मनातें ॥**

तिला या कविता पूर्णपणें उतरतात. मूळ कवीच्या हृदयांत बुडी मारून त्याचें नेमकें हृद्गत बाहेर काढण्यांत श्री० काळे किती तरबेज आहेत हें रवींद्रबाबूंच्या एका गीताचें–'निर्हेतुक प्रेम' या मथळ्याखालीं आलेल्या भाषांतरावरून उत्कृष्टपणें दिसून येईल.

**आश्चर्यानें होउनि बावरि ।**
**बघशी कां गे अशी भिरभिरी ।**
**बघेल स्वारी कधीं नच वरी ।**
**कळत कां नाहीं ? ॥**
**जरी मना हें पुरतें ठावें**
**तरी पुन्हा तें तिकडे धांवे ।**
**कामधाम मग कसें सुचावें ?**
**स्वस्थता नाहीं.**

† † †

**काय अर्पिते प्रेमी बाला ।**
**आणि अर्पिलें तिनें कुणाला ।**
**कळावयाचें जड जगताला**
**कधींही नाहीं ।**

मूळांतील लाडीकपणा, भाबडेपणा, उत्कटपणा, उत्कंठा व हृदयद्रावकता हीं वरील ओळींत इतकीं तंतोतंत उतरलीं आहेत कीं, रवींद्रबाबू जर मराठींत लिहिते तर त्यांचे लेखणींतून प्रस्तुत प्रसंगीं फारसे निराळे शब्द उतरले नसते असें अतिशयोक्तीवांचून म्हणतां येईल. 'Auld Robin Gray' या कवितेची जेमतेम रूपरेषा कित्त्यादाखल घेऊन 'व्यामोह' हें गोड करुण गीत रचलें आहे. त्यांतील—

**त्या गोड भयंकर वेळीं ।**
**पांखरें कण्हत भवतालीं ॥**
**कापती भिउनि वनवेली ।**
**बेचैन जिवाची होई ॥**

या ओळी तें गीत वाचून झाल्यावरही मनांत धरणें धरून बसतात. 'माया रमणी' हें कीट्सच्या La Belle Dame Sans Merci या गीताचें उत्कृष्ट भाषांतर आहे. दुभाषेपणाची जोखीम श्री० काळे यांची वाणी किती सहज व सफाईनें पार पाडूं शकते हें पुढील जवळ जवळ शब्दशः केलेल्या मुळाच्या अनुवादावरून उघड होईल—

**जलवंतीचे मित्र लव्हाळे येथ वाळले बघ सगळे**
**साधे भोळे मुके जाहले विहंगमाचे गोड गळे ॥**

'अमरपंथाचा यात्रेकरू' हें गुजरातीवरून केलेलें भाषांतर आहे. 'कां नच वदालिस तसें' हें गोड गीत हार्डीपासून उचललेल्या एका मध्यवर्ति कल्पनेभोंवतीं वहरलें आहे. बाकीचीं सर्व काव्यें ही श्री०काळे यांची निव्वळ स्वतःचीच कमाई आहे. त्यांत संस्कारापलीकडे कोणतीच उसनवारी नाहीं. श्री० काळे यांचीं

एकंदर कविता न्याहाळून पाहिली असतां ती सर्व आत्मप्रवण व भावगीतात्मक वळणाची असलेली दिसेल. हेंच तिचें वैशिष्ट्य होय व इतर लक्षणें हीं आनुषंगिकपणें आलेलीं आहेत. श्री० काळे यांच्या कवितेंत बहारीचीं सृष्टिवर्णनें जागोजाग आलेलीं आहेत. पण तींही भावनेच्या आसऱ्यानेंच उभीं आहेत. त्यांना निराळें स्वतंत्र अस्तित्व नाहीं. हें बहुतांशीं खरें असलें तरी त्यांचें मूळ सौंदर्य त्यामुळें अधिकच टवटवीत दिसतें.

**लाटेच्या फुटल्या कडेवर पडे चंद्रप्रभेची छबी ।**
**तेथें रंग अवर्णनीय रजतप्रक्षुब्धता दाखवी ॥**
**अर्धी लाट लपून गूढ तिमिरीं अर्धी प्रकाशीं खुले ।**
**त्या उर्मीसम या मदीय हृदयीं त्वत्प्रेम हेलावलें ॥**

अंतस्थ भावनेमुळें हें शब्दचित्र व या शब्दचित्रामुळें अंतस्थ भावना यांचा 'साधारणो भूषणभूष्यभावः' असा प्रकार झाला आहे. श्री० काळे भावगीत उत्कृष्ट लिहूं शकतात. त्याचप्रमाणें भावना व भाषा यांचें नातें त्यांच्या गीतांत सखीपार्वतीसारखें अभिन्न असतें. याचें प्रत्यंतर या संग्रहांतील बहुतेक कवितांवरून येईल. परंतु त्यांतल्यात्यांत 'तरंगिणी', 'मोहिनी', 'नदीतीरीं' या गीतांत त्यांची ही हातोटी ठळकपणें प्रत्ययाला येते. सृष्टिवर्णनाचें निमित्त करून अनावर भावना श्री० काळे यांच्या वाणींत कशी पुढें सरसावते हें 'खिडकींतून' या चुटक्यावरून दिसून येईल—

**त्या दूर दिगंतांतरीं**
**तरंगत भुरक्या ठिपक्यांपरी**
**या अथांग नीलांबरीं**
**दिसे का अंधुक कांहीं दुरी ?**

ते विहंगमांचे थवे ।
उडोनी जाती भलत्या जवें ।
जणु विचार माझे नवे ।
मच्चित्ताच्या छाया पडल्या दिसती मज त्यांवरी
ओढतें अंतर कोठें दुरी ।

'प्रतीक्षा' हा मथळा वाचकांना बुचकळ्यांत पाडणारा आहे. ह्या मथळ्याखालील कविता म्हणजे निःसार जीवन झालेल्या विधवेनें मृत्यूला उद्देशून केलेली काकुळतीची विनवणी आहे; हें लक्षांत ठेवलें तरच त्या कवितेचें खरें स्वारस्य वाचकांना कळणार आहे.

या संग्रहांतील कविता प्रतिभेच्या मुग्धावस्थेंतच श्री० काळे यांनीं लिहिल्या आहेत. तरी त्यांची सौंदर्यपिपासा,शुद्ध व उत्कट भावना, ओघशाली सहजसुंदर रचना, सूक्ष्म व खोल निरीक्षण आणि प्रौढ पण प्रसन्न भाषा हे गुण त्यांत ठळकपणें दिसून येतात. 'सहकार-मंजरी' वाचून श्री० काळे यांच्या परिणत प्रतिभेचा विलास पाहण्याला वाचक साहजिकच उत्सुक होतील. त्यांच्या आशा कल्पनातीत प्रमाणांत सफळ करण्याचें सामर्थ्य श्री० काळे यांत खास आहे व त्याचा प्रत्यय श्री० काळे लवकरच आणून देतील अशी खात्री बाळगायला कांहीं हरकत नाहीं. आतां 'सहकार-मंजरी' व वाचक यांची फारकत अधिक वेळ न होऊं देतां ही वेडीवांकडी प्रस्तावना येथेंच पुरी करतों.

वर्धा
१।६।३२

दामोदर व्यंकटेश घारपुरे

# सहकार-मंजरी

प्रत्येक भावनाक्षम अंतःकरणाच्या मनुष्याच्या आयुष्यांत केव्हांना केव्हां तरी असा एक काळ येतो कीं, त्या वेळीं तो काव्यात्म बनल्यावांचून राहात नाहीं. हा काल बहुधा आयुष्याचा वसंतकाळ, उच्च विद्यार्थी दशा, हा असतो. या दृष्टीनें पहातां माझ्यासारख्या प्रायः गद्यमय अंतःकरणाच्या माणसाच्या आयुष्याच्या वसंतांतही 'सहकार-मंजरी'चा उगम व्हावा यांत विशेषसें आश्चर्य नाहीं.

माझ्या सुमारें पंचवीस प्रसिद्ध–अप्रसिद्ध कवितांचा सहकार-मंजरी नांवाचा हा चिमुकला संग्रह आज मराठी वाचकांपुढें सादर करण्यांत येत आहे. इतक्या थोड्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध करण्याची घाई कां केली असा सवाल कोणीं केल्यास मला त्याला उत्तर देतां येणें कठीण आहे; निदान सुटकेचें समाधान तरी त्याला लाभावें म्हणून मी फार तर एवढेंच सांगूं शकेन कीं, यापेक्षां अधिक कविता मी लिहीन किंवा प्रसिद्ध करीन असें मला वाटत नसल्यामुळें हा खटाटोप केला आहे.

स्वतःच्या विवेचक बुद्धीवर विसंबून माझ्या बाडांतील कवितांपैकीं ज्यांमध्यें कांहींनाकांहीं तरी काव्यगुण आहे असें मला वाटलें त्यांचा या संग्रहांत मीं समावेश केला आहे. अभिरुचिभिन्नत्वामुळें एकाच कवितेबद्दल परस्परविरोधी अभिप्राय पडणें शक्य असतें. या संग्रहांतील कवितांपैकीं 'निःस्वार्थ प्रेम', 'माया रमणी' व 'अमरपंथाचा यात्रेकरू' या तीन भाषांतरित

आहेत. दोन कवितांच्या मध्यवर्ति कल्पना इंग्रजी काव्याचें वाचन करतांना सुचलेल्या आहेत; बाकीच्या स्वतंत्र आहेत. कै० सौ० मनोरमाबाई रानडे यांच्या कवितेंतील, या संग्रहाच्या आरंभीं उद्धृत केलेल्या अवतरणावरून, काव्यनिर्मितीबद्दलचा माझा दृष्टिकोण स्पष्ट आहे; तरी पण प्रथमपुरुषी प्रयोगानें दिग्दर्शित झालेली प्रत्येक भावना अगर कल्पना आत्मनिवेदनात्मकच आहे असें मानणें चुकीचें ठरेल हें रसिकांस वेगळें सांगावयास नको.

कवितेच्या शब्दरचनेंत पुनःपुन्हा दुरुस्त्या आणि फेरफार करीत राहण्याच्या माझ्या संवईमुळें प्रसिद्ध झालेल्या कवितांतूनही मीं वरींच पाठांतरें केलीं आहेत. माझे बालपणापासूनचे सहचर श्री०कृष्णाजी लक्ष्मण बापट, बी. ए., एलएल्. बी. यांच्या सूचनांचा या कामीं मला फार फायदा झालेला आहे. श्री०बापट लेखक म्हणून प्रसिद्ध नाहींत; पण प्रत्येक गोष्टीच्या अंगोपांगांबद्दल कसोशीनें तपासणी करणारी त्यांची चोखंदळ, काटेकोर, मार्मिक निरीक्षणशक्ति आणि विनोदी विचक्षणापद्धति यांचा माझ्या लिखाणाला संस्कार होत राहिल्यामुळेंच माझ्या गद्यपद्य लिखाणाला सुसूत्रता व नेटकेपणा आलेला आहे.

मुंबई येथें श्री० श्रीधर विनायक वर्तक, बी. ए., 'तुतारीचे पडसाद'कार यांच्या सहवासांत असतांना स्वतः ते, कविमित्र श्री० अनंत काणेकर बी. ए., एलएल्. बी., श्री० दामोदर व्ही. घारपुरे बी. ए., एलएल्. बी., श्री० व्ही. जी. पानसे, बी. एस्सी. यांच्या बरोबर काव्यचर्चा करण्याची जी संधि मिळे तिचाही या संग्रहांतील कवितांवर बराच परिणाम झालेला असून श्री० अण्णासाहेब कारखानीस यांच्या प्रेमळ सूचनांचाही कांहीं पाठांतरांत अंतर्भाव

झालेला आहे.या संग्रहांतील कवितांपैकीं बहुतेक सर्व 'रत्नाकर' मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.कै० दिवाकर-नाट्यछटाकार यांच्यामुळें 'रत्नाकर'शीं माझा संबंध जडला, 'रत्नाकरा'चे चालक श्री० अप्पासाहेब गोखले व त्यांचे बंधु श्री०हरि सखाराम गोखले यांची 'रत्नाकरा'चे निमित्तानें ओळख व परिचय होऊन तिचें स्नेहसंबंधांत रूपांतर झालें व त्यामुळेंच मराठी वाचकांशीं परिचय करून घेण्याची संधी मला मिळाली.ज्या जिव्हाळ्याच्या भावनेनें मी या सर्व मंडळींशीं निगडित आहें तिच्या दृष्टीनें पाहतां त्यांचे आभार मानण्याचा मीं प्रयत्न करणें हास्यास्पद ठरेल. तरी पण त्यांच्या मदतीचा कृतज्ञतापूर्वक निर्देश केल्यावांचून राहणें मला अशक्य आहे.

माझे मित्र श्री० केशवराव भोळे आणि त्यांची प्रिय शिष्या व कलावती पत्नी सौ० ज्योत्स्नाबाई यांनीं या संग्रहांतील माझी 'विरोधाभास' ही कविता अनेकवार रेडिओचे कार्यक्रमांत गाऊन व तिचें ग्रॅमोफोन रेकॉर्ड देऊन संगीतप्रेमी लोकांना सुपरिचित करून दिली याबद्दल श्रीयुत भोळे व सौ० ज्योत्स्नाबाई यांचा मी आभारी आहें.

—के. नारायण काळे

# गीत-क्रम


१ इच्छा ... ... ... ... ... ... .... ... १
२ फिर माघारी— ... ... ... ... ... २
३ निर्हेतुक प्रेम ... ... ... ... ... ५
४ व्यामोह ... ... ... ८
५ दिवंगत बंधूस ... ... ... ११
६ मायारमणी ... ... ... १५
७ मनोराज्य ! ... ... ... १९
८ बुजगबाहुलीं ... ... ... २०
९ ध्येयमूर्ति ... ... ... २२
१० थांबीव जादुगारी ... ... ... २३
११ खंडाळा घाटांत— ... ... ... २४
१२ विरोधाभास ... ... ... २५
१३ फत्तराचीं फुलें ... ... ... २६
१४ नसे गोडी गाण्यांत ... ... ... २७
१५ भावतरंगिणी ... ... ... ३०
१६ अमरपंथाचा यात्रेकरू ... ... ... ३८
१७ मोहिनी ... ... ... ४३
१८ हरपला दुवा ... ... ... ४५
१९ सांत्वन ... ... ... ४७
२० लो० टिळकांस— ... ... ... ४९

२१ कां नच वदलिस तसें ? ... ... ... ५०
२२ प्रतीक्षा ... ... ... ५२
२३ नदीतीरीं ... ... ... ५४
२४ विरक्ताचे उद्गार ... ... ... ५७
२५ समुद्रकिनाऱ्यावर ... ... ... ५९
२६ खिडकींतून ... ... ... ६१
२७ सहल ... ... ... ६४

# अर्पण

नोहे हा प्रतिभा-विलास,
अथवा नोहे कलावैभव,
जें आलें अनुभूतिला
रचियला शब्दांत तद्गौरव !
व्यक्ती वा घटना, कृतींस
विविधा ज्या जाहल्या कारण—
त्यांना ही सहकार-मंजरि
मम प्रेमें असो अर्पण !

“ रसिक म्हणे तुज विषय कशाचा ?
पाठ बोल तूं निज प्रेमाचा
विचार कर निज आयुष्याचा
बोल ती कविता
.................................”

कै॰ सौ॰ मनोरमाबाई रानडे.

# सहकार-मंजरी

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र.

## माझी इच्छा—

मातें चण्ड नदीप्रपात, गिरिचीं दुर्गें शिरें, काननें,
आहेत प्रिय फार हीं परि मला तेथें रुचे राहणें—
जीवांच्या निज जीवनार्थकलहीं जो तो जिथें आपला
कोणाची परवा कुणी न करणें, हा जेथला मामला !

लोकांच्या गलक्यांत त्या निजमनें निर्मीन मी काननें;
संमर्दांत अलिप्त-चित्त मग मी लागे तसें वागणें;
जे मातें प्रिय ग्रंथ तद्रससुधा सेवूनियां उन्मन
प्रेमें मत्सखिच्यासवें क्रामिन मी अज्ञात मज्जीवन

संपत्ती-यश-कीर्तिची नच बहू चित्तास माझ्या स्पृहा
मद्वैशिष्ट्य असेल तें मज सवें जावो लया; भाव हा !
अन्याचें सुख पाहतां निज हृदीं आनंद मानीन मी
कीं तद्दुःख दुरावितां लवभरी मद्भार होवो कमी !

होतां मी स्मृतिशेष यापरि, कधीं मन्मित्र कोणीतरी
एकादाच चुकार अश्रु, मम या ढाळो लिखाणांवरी!

लाट उसळती उशी मला
झालर-मोतीं जल-बिंदू;
मेघ डोलता मम दोला,
दीप टांगले रवि-इंदु !
गगनतारका तुटतांना
सांवरुनी त्यां करीं धरूं;
कौतुक करितिल सुरांगना
किन्नरनगरीं राज्य करूं !
मेल्या जगतीं काय कळे ?
जित्या जीवनीं चल येई
विरून जाइल मग दुबळें—
'फिर माघारी घरीं सई !' "



# निर्हेतुक प्रेम

Oh mother, the young Prince is to pass
by our door......

—*Rabindranath Tagore.*

जाहली घाई

सांग ना, सुचत नच कांहीं ! ॥ ध्रु०॥

युवराजांची खाशी स्वारी,
दारावरुनी आज दुपारीं—
जाइल, म्हणुनी तया अवसरीं—
सजव मज आई ! ॥

अंगीं घालूं काय भूषणें ?
केश रचूं मी कुण्या तऱ्हेनें ?
तोडे किंवा गेंद पैंजणें—
घालुं ग पायीं ? ॥

आश्चर्यानें होउन बावरि,
बघशी कां गे अशी भिरभिरी ?
बघेल स्वारी कधीं नच वरी !
कळत का नाहीं ? ॥

जरी मना हें पुरतें ठावें,
तरी पुन्हा तें तिकडे धांवे;
कामधाम मग कसें सुचावें ?
स्वस्थता नाहीं ! ॥

क्षणांत जातिल नयनां पुढुनी—
बघतां, बघतां; मात्र दुरूनी—
मृदु मुरलिध्वनि येइल कानीं,
कळतसे हेंहि ! ॥

असो कसेंही; परी तयांची
स्वारी इथुनी अजि जायाची—
वस्त्रभूषणें लेइन उंची—
म्हणुन मी बाई ! ॥

✻ ✻ ✻

दारावरुनी युवराजांचा—
सुवर्णरथ गे ! गेला साचा;
चमकत किरणीं तरुण रवीच्या !
काय नवलाई ! ॥

केला बुरखा मीं बाजूला,
हृदयावरची माणिक-माला—
काढीं; मार्गीं फेंकीं तिजला;
भान नच राही ! ॥

आश्चर्यानें होउन बावरि,
बघशी कां गे अशी भिरभिरी ?
उचलिल स्वारी कधीं नच वरी !
कळत का नाहीं ? ॥

रथचक्राच्या पडतां खालीं,
असंख्य ठिणग्या घेती उसळी;

साक्ष रक्तिमारूपें उरली
धुळीमधिं पाही !॥
काय अर्पिते प्रेमी बाला,
आणि अर्पिलें तिनें कुणाला,
कळावयाचें जड जगताला—
कधींही नाहीं !॥
असो कसेंही, गोष्टी घडली:—
युवराजांची स्वारी गेली,
रथ-मार्गीं मीं माळ फेंकिली,
काय नवलाई !॥

# फिर माघारी घरीं सई—

[या कवितेंत, संक्रमणकालीं अज्ञाताचें अनुमान बांधतांना 'तर्क-प्रतीष्ठित विचार' आणि 'अनिर्बद्ध कल्पना-शक्ति' यांच्यामधील संवाद कशा प्रकारचा असेल, हें रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.]

१

"फिर माघारी घरीं सई,
डोंगर-लाटा दर्यांच्या—
बघ हादरिती पाणभुई,
कोट छातिचा तर्यांच्या !
तनु तन्वंगी, तुझी दिसे
बागेमधली जशी जुई !
भलतें भरलें काय पिसें !
फिर माघारी घरीं सई !
कबरे भेसुर ढग भंवती—
बिजली त्यांवर नाच करी,
अथांग खालीं जलवंती
घोर मारिते घाय उरीं;
सैतानाचें सैन्य खडें,
पाताळांतुन वर येई,
मूर्तिमती ये भीति पुढें
फिर माघारी घरीं सई !"

२

"नजर तरळती टाक जरा,
त्या क्षितिजाच्या पलीकडे,
जल-नभ चुंबिति परस्परां-
प्रेमभरें, बघ त्या तिकडे.
बिनरंगांच्या छटांमधीं-
नसती नगरी दिसे दुरी,
'तिथें' बोलती कवी सुधी,
'स्फूर्ति जागती राज्य करी !'
पार्श्वभूवरी रम्य वनें
अस्फुट हलती किती तरी
सहजस्फूर्तीचीं कवनें
जलवंतींचीं, वाच खरीं !
त्या कुंजांतुन गमे कुणी
हाक मारितें मज, बाई;
कर लाटेचा उभारुनी
'ये इकडे गे ! गडे सई'

३

माझ्यासंगें चल सजणा
तुफान दर्या शेज बरी;
तूं राघू मग मी मैना,
स्वैर रमूं चल पैलतिरीं !

लाट उसळती उशी मला
   झालर-मोतीं जल-बिंदू;
मेघ डोलता मम दोला,
   दीप टांगले रवि-इंदु !
गगनतारका तुटतांना
   सांवरुनी त्यां करीं धरूं;
कौतुक करितिल सुरांगना
   किन्नरनगरीं राज्य करूं !
मेल्या जगतीं काय कळे ?
   जित्या जीवनीं चल येई
विरून जाइल मग दुबळें—
   'फिर माघारी घरीं सई !' "



# निर्हेतुक प्रेम

Oh mother, the young Prince is to pass
by our door......

—*Rabindranath Tagore.*

जाहली घाई
सांग ना, सुचत नच कांहीं ! ॥ ध्रु०॥

युवराजांची खाशी स्वारी,
दारावरुनी आज दुपारीं—
जाइल, म्हणुनी तया अवसरीं—
सजव मज आई ! ॥

अंगीं घालूं काय भूषणें ?
केश रचूं मी कुण्या तऱ्हेनें ?
तोडे किंवा गेंद पैंजणें—
घालुं ग पायीं ? ॥

आश्चर्यानें होउन बावरि,
बघशी कां गे अशी भिरभिरी ?
बघेल स्वारी कधीं नच वरी !
कळत का नाहीं ? ॥

जरी मना हें पुरतें ठावें,
तरी पुन्हा तें तिकडे धांवे;
कामधाम मग कसें सुचावें ?
स्वस्थता नाहीं ! ॥

क्षणांत जातिल नयनां पुढुनी—
बघतां, बघतां; मात्र दुरूनी—
मृदु मुरलिध्वनि येइल कानीं,
कळतसे हेंही ! ॥

असो कसेंही; परी तयांची
स्वारी इथुनी अजि जायाची—
वस्त्रभूषणें लेइन उंची—
म्हणुन मी बाई ! ॥

* * *

दारावरुनी युवराजांचा—
सुवर्णरथ गे ! गेला साचा;
चमकत किरणीं तरुण रवीच्या !
काय नवलाई ! ॥

केला बुरखा मीं बाजूला,
हृदयावरची माणिक-माला—
काढीं; मार्गीं फेंकीं तिजला;
भान नच राही ! ॥

आश्चर्यानें होउन बावरि,
बघशी कां गे अशी भिरभिरी ?
उचलिल स्वारी कधीं नच वरी !
कळत का नाहीं ? ॥

रथचक्राच्या पडतां खालीं,
असंख्य ठिणग्या घेती उसळी;

साक्ष रक्तिमारूपें उरली
धुळीमधिं पाही ! ॥
काय अर्पिते प्रेमी बाला,
आणि अर्पिलें तिनें कुणाला,
कळावयाचें जड जगताला—
कधींही नाहीं ! ॥
असो कसेंही, गोष्टी घडली:—
युवराजांची स्वारी गेली,
रथ-मार्गीं मीं माळ फेंकिली,
काय नवलाई ! ॥

# व्यामोह

सुख शयनीं शय्येवरतीं बेचैन जिवाची होई,
जागीही नसतां पुरती झोंपही न अगदीं येई,
ते प्रसंग येतां स्मरणीं मी मलाच विसरुन जाई.

मग अंतःफलकावरतीं एकेक स्पष्ट उठोनी
स्वप्नांच्या मौजा गोड मुकुलीत लोचनांपुढुनी
सारख्या हळुहळु सरती अस्पष्ट विविध रंगांनीं.

अंगांत सळसळे ताप डोळ्यांवर गुङ्गत झोंप;
बाहेर ऊन्ह सोनेरी पर्जन्य पडे कौलारीं,
ध्वनि त्याचा टपटप कानीं गुणगुणतो भलतीं गाणीं;

त्या गोड भयंकर वेळीं
पाखरें कण्हत भंवतालीं,
कापती भिउन वनवेली
बेचैन जिवाची होई!

आठवतां दिन ते आतां मन वळून मागें पाहे—
जों शैशव सीमा सुटुनी यौवनीं प्रथम पद राहे;
मर्दानी बाणा तव तो दृष्टिपुढें मज दिसताहे!

सोत्साह तयारी केली तूं मुलुखगिरीवर जाया,
कळविलें कुणाला न परी भाक मला दिधली राया!
परि कसा विसर मग पडला स्वप्नसुखें गेलीं वांया!

नच निरोप तूं धाडियला वार्ता न ऐकिली कानीं,
पाहुनी भिरिभिरीं वाट कण्ठिल्या किती दिनरजनी–
खिडकींत सारखी बसुनी एकटीच वेड्यावाणी !

एकेक शब्द जुळवोनी—
मी स्वयें प्रीतिनें रचुनी—
शौर्याचीं तुझिया गाणीं—
रात्रंदिन अविरत गाई !

दुर्दैव लागलें पाठीं काळाचा घाला आला,
मम जननी प्रेमाधार अन्तक ने स्वगृहीं तिजला,
जाहला बाप बेमार अन्न ना मिळे खायाला !

पाहुनी दुर्दशा अमुची साह्या ये यांची स्वारी,
चौमुलुखीं होती कीर्ती दौलतिची त्यांच्या भारी;
बाबांना पडला मोह प्रीति करी काय बिचारी !

केला न विचार वयाचा संमती मला नच पुशिली,
निर्जीव बाहुली तैशी लग्नमिषें मजला विकिली!
तोंवरी तुझी जी होती ती तदा परस्त्री झाली !

ओरडती शास्त्रें कानीं
स्मरणें तुज पाप म्हणोनी
सांगत्यें मना फिरफिरुनी
परि अंतर ऐकत नाहीं !

विसरून जावया तुजला व्यवसाय नवे काढियले;
अवशेष हत प्रेमाचे हृदयांत खोल दडवियले;

# व्यामोह

सुख शयनीं शय्येवरतीं बेचैन जिवाची होई,
जागीही नसतां पुरती झोंपही न अगदीं येई,
ते प्रसंग येतां स्मरणीं मी मलाच विसरुन जाई.

मग अंतःफलकावरतीं एकेक स्पष्ट उठोनी
स्वप्नांच्या मौजा गोड मुकुलीत लोचनांपुढुनी
सारख्या हळुहळु सरती अस्पष्ट विविध रंगांनीं.

अंगांत सळसळे ताप डोळ्यांवर गुङ्गत झोंप;
बाहेर ऊन्ह सोनेरी पर्जन्य पडे कौलारीं,
ध्वनि त्याचा टपटप कानीं गुणगुणतो भलतीं गाणीं;

त्या गोड भयंकर वेळीं
पाखरें कण्हत भंवतालीं,
कापती भिउन वनवेली
बेचैन जिवाची होई!

आठवतां दिन ते आतां मन वळून मागें पाहे—
जों शैशव सीमा सुटुनी यौवनीं प्रथम पद राहे;
मर्दानी बाणा तव तो दृष्टिपुढें मज दिसताहे!

सोत्साह तयारी केली तूं मुलुखगिरीवर जाया,
कळविलें कुणाला न परी भाक मला दिधली राया!
परि कसा विसर मग पडला स्वप्नसुखें गेलीं वांया!

नच निरोप तूं धाडियला वार्ता न ऐकिली कानीं,
पाहुनी भिरिभिरीं वाट कण्ठिल्या किती दिनरजनी–
खिडकींत सारखी बसुनी एकटीच वेड्यावाणी !

एकेक शब्द जुळवोनी—
मी स्वयें प्रीतिनें रचुनी—
शौर्याचीं तुझिया गाणीं—
रात्रंदिन अविरत गाई !

दुर्दैव लागलें पाठीं काळाचा घाला आला,
मम जननी प्रेमाधार अन्तक ने स्वगृहीं तिजला,
जाहला बाप बेमार अन्न ना मिळे खायाला !

पाहुनी दुर्दशा अमुची साह्या ये यांची स्वारी,
चौमुलुखीं होती कीर्ती दौलतिची त्यांच्या भारी;
बाबांना पडला मोह प्रीति करी काय बिचारी !

केला न विचार वयाचा संमती मला नच पुशिली,
निर्जीव बाहुली तैशी लग्नमिषें मजला विकिली!
तोंवरी तुझी जी होती ती तदा परस्त्री झाली !

ओरडती शास्त्रें कानीं
स्मरणें तुज पाप म्हणोनी
सांगत्यें मना फिरफिरुनी
परि अंतर ऐकत नाहीं !

विसरून जावया तुजला व्यवसाय नवे काढियले;
अवशेष हत प्रेमाचे हृदयांत खोल दडवियले;

ओठांच्या बांधाआड मम भग्न हृदय दडपियले!
परि एकाएकीं कुठुनी आलास सख्या परतून;
तुज नाहीं ओळख उरली हरपतें परी मम भान!
मी कशी शांतवूं हृदया जातां तूं दारावरून!

मी शय्यादासी यांची परि चित्त वसे तुजपाशीं,
करपाश पतीचे पडतां बोंचती सुया हृदयासीं;
देहास ऐषआराम मन परी सदा उपवासी!

पेटती सभोंतीं खाई,
भरलें घर खाया येई,
गर्दींत सुनेपण राही,
बेचैन जिवाची होई!

९८८८



सं. भा. १०३८
७-८-३२

# दिवंगत बंधूस—

There is no flock, however watched and tended
But one dead lamb is there !
There is no fireside howsoe'er defended,
But has one vacant chair !

—*Longfellow*.

१

श्रांत होउनी देह टाकितां रात्रीं धरणीवरी
तव स्मृति, हृदयीं ताण्डव करी !
एकसारखा जीव तळमळे उदास मन होउनी
सखया ! तुज ध्यानीं आणुनी.
कधीं अवचटें जागें व्हावें झोपेंतुन दचकुनी
डोळे अश्रूंनीं दाटुनी !
इच्छा नसतां एकामागुन एक हुंदका वरी—
येई दुःख दाटुनी उरीं
या बाजूवर, त्या बाजूवर वळुनी वरचेवरी—
दुःखावेगें हृदय दाबुनी घुटके गिळिले तरी—
अंतःफलकीं चलच्चित्रपट चित्तचक्षुला दिसे—
प्रसंग मागिल आठवतां तो, मन हो वेडें पिसें !

२

आठवतां तो प्रसंग भरते धडकी माझ्या उरीं;
अजूनहि बुद्धि होत बावरी !

धड धड हृदयीं चालत होती, घाव घणाचे शिरीं,
चोरुनी चढलों घर-पायरी—
माजघरीं मीं दृष्टि फेकितां जाणिव मज जाहली
शांतता भीषण जें पाहिली.
एक घोंगडी—प्रेत तीवरी—दो बाजूं बैसले
अनुज तव शोकें व्यापादिले !
हळूच जाउन बसें बाजुला आच्छादन काढिलें,
तव मुख पुनःपुन्हा चुंबिलें !
सर्वहि रडलों मुक्या मनानें गळां घालुनी गळे
नेत्र बोलले परस्परांशीं ज्याचें त्याला कळे !

३

स्वगृहा सोडुन गेलां नव्हतां कोठेंही अजवरी
अकालींच कां चिरंतनाची मुशाफरी घ्या शिरीं ?
आडवाट ती-सखा सोबती बरोबरी नच कुणी,
अम्हांला गेलां कां टाकुनी ?
दिली परीक्षा निकाल नाहीं अजुन तिचा लागला,
तोंच कां मृत्यू कवटाळिला ?
पुरी जहाली विद्या बहुधा फळ हातीं लाधलें
तों कसें हत-दैवें नाशिलें ?
भव्य मनोरे रचिले त्यांचे कळस अतां बांधणें
संपलें तोंच येथलें जिणें !

वार्ता ऐकें 'रुग्ण तूं' अशी; भेटाया धावलों;
अहाहा! परी कसा वंचलों!

४

विवादपटुता तुझी अलौकिक गुरुजनिं कुतुकास्पदा;
आश्चर्यानें स्तंभित जन हो परिसुनि वाक्संपदा;

नव्या जुन्याचें घातुक बंधन देउन भिरकावुनी
स्वातंत्र्याच्या दिव्यौघाचे पाट तुझ्या भाषणीं.

लिहिले सुंदर लेख तयांची शाई नच वाळली!
कालाभावीं किती लिखाणें तव अपुरीं राहिलीं!

अर्धेमुर्धे लेख वाचितां, लिहिता हा या पुढें
सुंदर किति तें ध्यानीं येउन, कसें आवरे रडें?

उदात्त इच्छा, भव्य कल्पना, नाना आशा, तशा
उच्चत्वाच्या दिव्य भराऱ्या, नाश पावल्या कशा?

स्वातंत्र्याच्या नवचंडोला! सोडुन अवनीतला
अकालींच कां उषासमायीं तूं खमार्ग अवलंबिला?

५

धागे दोरे मर्त्य जगांतिल तुटले सारे अतां
भावबंधनीं परस्परांच्या राहूं परि तत्त्वतः!

तव आत्म्याच्या शान्तीस्तव जे अनंत करितिल विधी!
तयांची पर्वा मजला कधीं?

या हृदयाच्या अन्तर्भागीं अखण्ड जळते चिता
जलाञ्जलि अश्रू हे वाहतां.
शौच्याशौच्यें बाह्य बन्धनें मला कशाला हवीं ?
तुझी मी जाणितसें थोरवी !
कुणी अर्पितिल पिण्ड, तिलांजलि; कुणी अर्पितिल बळी
या हृदयाच्या परि स्मशानीं मीं तुज जागा दिली !
स्मृतिचित्रें जीं चित्तीं माझ्या तयां न जगतीं तुला
म्हणुन हा शिलालेख कोरिला !



# माया—रमणी

What can ail thee Knight-at-arms ?
—*Keats*

१

" काय गांजितें तुझ्या मनातें मातें वद, तें बारगिरा—
कुणा कारणें अशा तऱ्हेनें व्यर्थ हिंडणें तुवां धरा ?
जलवंतीचे मित्र लव्हाळे येथ वाळले बघ सगळे
साधे भोळे मुके जहाले विहंगमांचे गोड गळे !

२

" मलूल मुद्रा अशी कशानें खेद होतसे कां वीरा ?
तूं परदेशी कां दिससी ? बा ! दुःख विसरुनी बोल जरा !
रान गांवची निरलस बाला चपल खिलाडी या काला—
संग्रह करुनी स्वस्थ बैसली; काम न उरलें कृषीवलां !

३

" प्रफुल्ल सुंदर कमलासम तव असावयाचें मुख खुललें,
एकाएकीं अकालींच कां सखया तें सुकुनी गेलें ?
नव्या नवतिच्या बहरीमाजी गुलाब जे गालांवरतीं
चिंताज्वालीं तुझ्या कपोलीं कोमेजुन कां ते जाती ? "

४

"वृक्षलतांनीं फळांफुलांनीं गजबजलेल्या स्थलीवरी–
मला भेटली कोणी नारी, स्वर्लोकींची जणूं परी;
नजर विखारी चंचल भारी न्यारी ती पाणीदारी;
चपल पाउलें; कुन्तल कुरळे, अग्रें गहिरीं सोनेरी!

५

"भूषविण्याला विशाल भाला मोहक पुष्पांच्या
माला–
सुबक विणीचे बिंदिबिजवरे,गजरे, गुम्फुन दिले तिला;
प्रेमभरानें तिरक्या नयनें तिचें पाहणें मज भुलवी,
मधु, हळु, हित, मित गुज गोष्टींनीं बाला मम अंतर
झुलवी.

६

"अबलख वाजीवरी माझिया करून तिजला स्वार–
दौड निघालों जगा विसरलों, झालों मी बेमार!
या बाजूला, त्या बाजूला, लवुनी मागें पुढतीं–
तिनें गाइल्या परोपरींच्या दिव्य परींच्या गीती!

७

रानामधलीं तिनें आणिलीं रुचिर रुचीचीं विविध,मुळें,
मला अर्पिलीं पक्व चांगलीं सुधा मधुरशीं
दिव्य फळें;

अस्फुट गोष्टी हलत्या ओष्ठीं सांगे ती माझ्या कानीं–
'बादशाहा या आपण रानीं, मी तर हो अपुली राणी!'

८

" त्या रमणीनें प्रेमभरानें धरुनि करानें मजला
कुंजीं नेलें, दीर्घ उसासे दुःखें टाकी बाला!
अश्रुश्रेणी मन्द वाहिनी वाहे गालांवरुनी;
नेत्र झांकिले निज प्रियेचे चुंबनमुद्रा करुनी!

९

" चटकचांदणी मंजुळवाणी गोड गोड गाउन गाणीं–
अंगावरुनी कर फिरवोनी निद्रा मजला मग आणी
तुंग गिरीच्या शीतल शिखरीं शेवटलें मीं त्या काळीं–
स्वप्न पाहिलें;–हाय काय हें लिहिलें विधिनें मम भाळीं!

१०

" नबाबजादे, प्रसिद्ध योद्धे, राजे तालेवार
किती पाहिले मुख सुकलेले इष्काचे सरदार!
मला पाहती, सर्व बोलती सहसा एका बोलें–
'कठोर माया-रमणीनें या दास खास तुज केलें!'

११

" अस्त भानुच्या मृत प्रकाशीं भीषण काळे डोळे–
गरगर फिरती, ओंठ हालती, पिशाच करिती चाळे,

भीषण असलें स्वप्न पाहिलें दचकुन जागा झालों !
न कळे मजला कडे-कपारीं येथें कैसा आलों !

१२

" येथें भटकत असा पातलों, चमत्कार हा असे खरा,
बापुडवाणें याच कारणें व्यर्थ हिंडणें सर्व धरा;
जित्या जिवाचे जलवंतीचे मित्र लव्हाळे ते सगळे-
जरी वाळले; मुके जहाले विहंगमांचे गोड गळे."



# मनोराज्य !

दरी खोरीं तुझ्यासाठीं पदतलीं घातलीं मोठीं,
नदी, नाले, कडे, खाडे पथीं लंघीं तुझ्यासाठीं !
ओढिशी आपुल्यापाशीं फेंकुनी प्रीतिच्या पाश
अध्व-खेद-श्रमी गात्रां हर्दींची पालवी आशा
तुझ्या दारीं उभा टाकें कुणा हा रंक दिसप
पाहुनी वाट शिणलों मी परी येशी न वा
श्रमें विकलांग झालेला तरुतळीं बैसलों ास !
टेकुनी कोपरें अंकीं; करतळीं ठेवुनी शी ची,
तोंच तूं वैभवीं अपुल्या शरद्विद्युल्लतेवा ची;
चमकुनी दूर गेलीस निघोनीयां दुजा स्था !
स्वसंवादीं निजानंदीं मला तूं पाहिलें नाहीं .
भंगली आस जीवाची जाहल्या शून्य दिक् द
मनोराज्यीं मनोरे मीं रचोनी डाव मांडियला,
परी दुर्दैव ये आड, चुरा त्यांचा पुरा झाला !

भीषण असलें स्वप्न पाहिलें दचकुन जागा झालों !
न कळे मजला कडे-कपारीं येथें कैसा आलों !

१२

" येथें भटकत असा पातलों, चमत्कार हा असे खरा,
बापुडवाणें याच कारणें व्यर्थ हिंडणें सर्व धरा;
जित्या जिवाचे जलवंतीचे मित्र लव्हाळे ते सगळे-
जरी वाळले; मुके जहाले विहंगमांचे गोड गळे."



# मनोराज्य !

दरी खोरीं तुझ्यासाठीं पदतलीं घातलीं मोठीं,
नदी, नाले, कडे, खाडे पथीं लंघीं तुझ्यासाठीं !
ओढिशी आपुल्यापाशीं फेंकुनी प्रीतिच्या पाश
अध्व-खेद-श्रमी गात्रां हर्षांची पालवी आश !
तुझ्या दारीं उभा ठाकें कुणा हा रंक दिसपार !
पाहुनी वाट शिणलों मी परी येशी न बाहेर !
श्रमें विकलांग झालेला तरुतळीं बैसलों दूर,
टेकुनी कोपरें अंकीं; करतळीं ठेवुनी शीर.
तोंच तूं वैभवीं अपुल्या शरद्विद्युल्लतेवाणी,
चमकुनी दूर गेलीस निघोनीयां दुजा स्थानीं
स्वसंवादीं निजानंदीं मला तूं पाहिलें नाहीं !
भंगली आस जीवाची जाहल्या शून्य दिक् दाही !
मनोराज्यीं मनोरे मीं रचोनी डाव मांडियला,
परी दुर्दैव ये आड, चुरा त्यांचा पुरा झाला !

# बुजगबाहुलीं

सुपिक सपाटी शेतीभाती,
मळयांत पिकती माणिकमोतीं,
परी निजार्थी ज्यांची प्रीती-
त्या पुरुषांच्या स्वार्थी रीती-
बुजगबाहुलीं त्यांत उभविती-
पेंढ्याच्या त्या निर्जिव मूर्ति-
तीर-कमानी कृत्रिम हातीं-
चिंध्या रचिल्या अंगाभंवतीं-
भिववायाला
विहंगमांला
केला असला
फुसका बागुलबोवा !

२

सत्त्वांची ज्योत निमाली-
मृत रूढींचीं प्रेतें असलीं-
पुराणिकांनीं जरीं टांगिलीं-
दंभनीतिचीं वस्त्रें ल्यालीं-
स्वार्थी अज्ञानें रक्षियला
असला कचरा शास्त्रीं भरला-
रोधायाला खऱ्या प्रगतिला;
मोठीं नांवें खोटीं त्यांला-

सद्धर्माचा
पथ सत्याचा
अडवायाचा
असला स्वार्थी कावा !

३

परी आमुची मिरासदारी–
इथें चराया अम्हां न चोरी,
वतनदारिही, नच लाचारी–
बुजगबाहुलीं असलीं उपरीं
मोडूं फेंकूं दिशां-दिशांला—
तुडवूं चिरडूं पायीं त्यांला !
मालक आम्ही; नच चोरांला—
अवसर देऊं धनीपणाला;

अमुची प्रीती—
तत्त्वांवरतीं
व्यर्थ मिरवती
त्यांशीं अमुचा दावा !



# ध्येयमूर्ति

अंबुदां भंगुनी । गगनिं सौदामिनी.
चमकली कामिनी । तेविं पुढतीं. ॥ १

शुभ्र दंतावली । हांसतां देखिली ।
दृष्टि मम लोभली । सहज तेथें. ॥ २

अंजिरी पैठणी । नेसली भामिनी ।
मधुर मधुयामिनी । सम विराजे. ॥ ३

हरित मृदुशाद्वलीं । बैसुनी तरुतळीं ।
नजर तूं टाकिली । अयि मृगाक्षी ! ॥ ४

प्रथम तुज पाहिलें । अमित दिन जाहले ।
परि न कधिं वाहिले । शब्द तुजला. ॥ ५

शून्य वातायनीं । बैसुनी निशिदिनीं ।
हृदयसिंहासनीं । मूर्ति निरखीं. ॥ ६

रूप तव मोहिनी । बिंबलें लोचनीं ।
म्हणुन मधु गायनीं । पूजिं तुजला ! ॥ ७

# थांबीव जादुगारी—

“ माझ्याच साठिं का हा तूं थाटमाट केला ?
कां आस लाविसी ही खोटी खुळ्या जिवाला ?

मी आत्मवंचना ही जाणोनियां फिरोनी—
फसतों कृपा करीं गे ! घे जादु आवरोनी.

चित्तांत प्रेम-लवही असला तरी उदास—
राहीं, न आग लावीं आतां खुळ्या दिलास !

नाहीं घडावयाचें केव्हांहि; व्यर्थ त्याची,
हुरहूर आणि आशा हृदयास फार जाची;

म्हणुनी तुलाच प्रार्थीं, बाळे ! पुरेत चाळे !
थांबीव जादुगारी थांबीव खेळ अपुले.

# खंडाळा घाटांत

नेसी बाष्प-रथा ! इथून हरुनी मद्देह तूं सत्वर
घाटांतील उदात्त दृश्य परि ने चित्ताप्रती; मागुती;
बाजूला तुटके कडे, नग-शिरें दृष्टीपुढें ठाकती
झाले धूसर बाष्पयुक्त सगळे ज्यांचे महाकंधर !
शोभे दाट अफाट पाच-हिरवी झाडी उतारावर
काळोभिन्न कपार ज्यांतुन झरे घेती उड्या खालती;
होवोनी परिवर्तनें वर खुले सद्रंग दीर्घाकृती
स्वर्भू जोडित इन्द्र-चाप, नमवी साश्चर्य माझें शिर !
नित्याचा रथ-चालका ! तुज दिला हा मार्ग संयोजुनी
कांहीं ही तुज यामुळें न नवता दृश्यें अशीं भाविती
नित्याचा सहवास अंध करितो सौंदर्य-दृष्टीप्रती—
होतें जीवन मानवी म्हणुनिया कंटाळवाणें जनां—
अद्यापी परि रोविलें न जगतें नैराश्य माझ्या मनीं
सारी कौतुक-पूर्ण सृष्टि म्हणुनी पाही मनोभावना !

# विरोधाभास–?

तूं बोलल्याविना मी नाहींच बोलणार,
बोलाविल्याविना ना पाऊल टाकणार;
पुसल्याविना स्वयें तूं नाहींच सांगणार,
पाहून रीत तूझी, तैसाच वागणार !
लहरी मनास तूझ्या मी कोणत्या उपायें—
रिझवूं शकेन, याची ना कल्पना मना ये;
माझ्या तुझ्यांत कोठें कांहींच साम्य नाहीं;
व्यामोह हो मनाला परि प्रीतिच्याच पायीं !
तूं बाह्य वैभवाला होसी भुलून चूर,
सौजन्य अंतरींचें मज तेंच एक प्यार;
जे जीवभाव माझे, तुज येत वीट त्यांचा,
प्रेमादरार्थ त्यांच्या तव उत्सहे न वाचा;
प्रिय जे तुला कुणी, त्यांपासून दूर दूर—
मी राहतों, मला ते नाहींत मानणार !
हें सृष्टिसिद्ध जेथें वैधर्म्य राहताहे—
प्रासाद प्रीतिचे कां बांधी तिथें विधी हे ?
झालीस या जिवाची जर तूं कधीं धनीण,
होईल आपुलें का आयुष्य सौख्य-पूर्ण ?
कोडें मना सुटेना, कांहीं न होत बोध;
भिन्नत्व सत्य हें कीं, आभास हा विरोध ?

# फत्तराचीं फुलें

पृथ्वीपासुन फार दूर वरतीं लक्षावधी योजनें—
होतें शोभत, शोभवीत गगना, तेजाळ ताराद्वय !
डोळ्यांचा चवचाल नाच करितां उन्मीलनोन्मीलनें-
पाहोनी वसुधा-जडत्व, तिज तें हांसे सदा निर्भय !
होतें बद्ध मृणाल-तंतु-मृदुशा तें प्रीतिच्या बंधनें—
क्लेशाचा नच लेश ठाउक तया आनंद त्याचें जिणें !

२

त्या दिव्यांतिल सौख्य सांडुन परी, कां ना कळे तेथुनी
तारा एक तयांतली अवचटें पृथ्वीकडे धांवली;
मैत्रीचे तुटतांच बंध मग ती तारा विरे भंगुनी
तत्खंडें जडता जडून पडलीं सर्वत्र पृथ्वी-तलीं !
जोडीदार तिची विषण्ण-हृदया व्योमींच जी राहिली-
पाहोनी विनिपात, हा बहु तिनें डोळां टिपें टाकिलीं.

३

शोकार्ता विरहाश्रु गाळित अशी ती बैसतां त्या
स्थलीं
आसूं दैववशें चुकून पडलें खंडें जिथें तीं वनीं;
बिंदू ते पडतांच हास्य-लहरी पाषाण-चित्तांतुनी-
आल्या; अंग थरारलें; बहरली तों शुभ्र पुष्पावली !
खाशी सोबत माझिया मृतमना होईल ही वाटलें-
तेव्हांपासुन वागवीं स्वहृदयीं तीं फत्तराचीं फुलें !

# नसे गोडी गाण्यांत—

"नसे गोडी गाण्यांत यास कांहीं,"
असें माझे बोलती सर्व स्नेही;
परी आहे सत्यांश अल्प त्यांत—
रंजवी ना मच्चित्त कलागीत !

ताल, साथीचा गायकी पसारा—
भाव अर्थाविण फोल असे सारा !
अर्थ नसतां जे ध्वनी काढियेले—
ज्योति नसतां ते दीप जसे झाले !

वृत्ति करुनीया सकल संकलीत—
शांति चित्ता दे, तेंच खरें गीत !
भाव-अर्थ-ध्वनि संग असे जेथें,
गीत रंजावितें तेंच मन्मनातें !

अशी केव्हां मानवी गायकांनीं
गायिलीं तर ऐकेन सुखें गाणीं !
परी त्यांचें संगीत शास्त्रयुक्त
क्षोभवीतें नच शांति मना देत !

२

म्हणुन अन्तःश्रवणांस सुखविणारें,
चित्तवृत्तींचा लयहि लावणारें,

गीत परिसाया एकटा दिनान्तीं—
बैसतों मी जाऊन शेतभातीं !

मन्द झुळझुळ आवाज मृदु करीत
गोड पाणी भिजवितें सर्व शेत;

पितां जीवन मातींत स्फुरे वाचा,
छिद्रछिद्रांतुन घोष गायनाचा !

तोष भूचा पाहून तुष्ट झाले
कीट दर्दुर गावया सज्ज ठेले !

ध्वनी दुरुनी राहाट-गाडग्यांचा
ताल धरितो त्या मूक गायनांचा !

सर्व बेसुर बेताल ध्वनींना या
एकसूत्री करणार महा माया—

मेळमिळवुन संसार सांवराया—
असे बसलेली सृष्टि तया ठाया !

३

पक्षिगीतांचा फार बोलबाला
आजवेरीं जगतांत असे झाला !

वीट त्याचा येऊन चुकविण्या तें—
प्रभातीं मी जातसें सागरातें.

ऊर्मिवेलाआघात तालयुक्त
मन्द वायू मृदु साथ ज्या करीत

वीचिवीचींतुन संथ घुमे गीत
बैसतों तें परिसीत शान्त चित्त !

वरी पसरे आभाळ तऱ्हेवार
[ प्रेम जैसें निर्लेप निराधार ]

रंग त्याचे गीतांत गुंफवून
वीचि वाहुनियां नेति जलांतून !

शब्द गंधादिक विषय इन्द्रियांचे
परी गोचर त्यांना न व्हावयाचें—

असें उच्चैस्तर तत्त्व दिव्य कांहीं
अब्धिसंगीतीं सुप्त गमे राही !

म्हणुन पुलिनीं मी एकटा बसून
ऐकतों तें अब्धिचें दिव्य गान;

सर्व ऐहिक विस [illegible] स्मरून
व्यापकत्वीं व्यक्ति [illegible] करुन लीन !

# तरंगिणी

[ एक प्रेमकथा ]

“नाना नाट्य-कथा, स्वभाव-कवनें, होतीं जरी वाचिलीं—
प्रीतीचे मधु, गूढ, पाश नव्हते केव्हां स्वयें साहिले !
प्रेमाची महती विशेष दिसतां ग्रंथांतरीं वर्णिली—
ती सारी कविकल्पना समजलों, मी मानसीं त्यामुळें !
चित्रें सुंदर पाहुनी, जनमुखें नाना कथा ऐकुनी—
ग्रंथीं वाचुनि, अब्धिरूप मनसा ज्यानें असे कल्पिलें
तो हांसे, अति रंजना समजुनी अंभोधिच्या वर्णनीं;
होती त्यापरि मतिस्थती, न तुज जोंपर्यंत मीं पाहिलें.
आतां ये पुरता परी अ[illegible]वा कोतेपणा पुस्तकी !
कोणीही, कितिही अस[illegible] लिहिलें तें पूर्ण मी ना गणीं;
भाषा गौरव सर्व हो विसरुनी जिव्हा मदीया मुकी—
जीवाच्या श्रवणेंद्रियें परिसतीं सारें तुझ्या भाषणीं !
प्रीतीचें हृदयांत बीज पडतां, हेलावल्या भावना
सृष्टीचें बदलून रूप पहिलें, झाली नवी लोचनां !

२

कोठें वास तुझा ? कुळांत कुठल्या तूं जन्म वा घेतला ?
तूं झालीस कशी मशी परिचिता हें गूढ आहे मला !

नाना तर्कवितर्क बांधिति, परी हे लोक तुझ्याविशीं;
नाहीं जाणित मी तुला, तर तयां देऊं जबानी कशी?
"संबोधून जिला अनेक लिहिलीं गीतें न ती स्त्री वसे;
देवी कल्पकता अमूर्त, तिजला मीं आळवीलें असे—
जी मत्प्रीतिनिधान या प्रकटते काव्यांतुनी निस्तुला
व्हावें ज्ञान तिचें यथार्थ तर जा, भेटा, विचारा, तिला!
उत्कर्षें गुण जो जिथें प्रकटला तेथून तो आणुनी,
जें दिव्यत्व कुठें कुठें विलसलें तें सर्वही वेंचुनी—
जें नारीहृदयांत मंगल असे तें आणुनीयां मनीं—
मूर्ती हृत्फलकावरी लिहियली काव्यास ती स्वामिनी!"
कांहीं यापरि सांगतों जुळवुनी गोष्टी स्वमित्रांप्रती
त्यांना त्या पटणार नाहित, असें सांगे सदा सन्मति!

३

आलों मी मधु-हासिनी! तव गृहीं तो आठवे का दिन?
गेले वत्सर त्यावरी बहु, तरी ताजीच त्याची स्मृति,
होता मंगल शारदीय दिन तो, ज्योतिष्मती रात्र ती;
त्वद्बंधू मज तेधवां प्रथम ये गेहाप्रती घेउन!
कोनाड्यांत सुरेख एक समई ओटीवरी तेवते,
ईषद्भिन्न तमीं गभीर पसरी जी गूढ खिन्न छटा!
"येथें बैस जरा" म्हणून; मजला सोडूनियां एकटा-
गेला आंत निघून तो; जड मनें मी वाट पाही तिथें.

होतों जों क्षणमात्र यापरि उभा तों मंद गीत-स्वर—
आले कर्णपथीं, उरीं घडघडे मच्चित्त वेडावुनी;
झालों निश्चल मी, जरा निरखिलें दारांत डोकावुनी—
दृष्टी तों खिळली मुखावर तुझ्या, निस्तब्ध हो अंतर!
लागे चाहुल ती तुला थबकलें गाणें न जातां क्षण—
जासी तूं निघुनी; परी मुरडुनी कां फेकिलें ईक्षण?

४

केलें प्रेम तुझ्यावरी म्हणुन का व्हावी क्षमायाचना!
माझा हा अपराध का न शकलों मी आडवाया मना?
हें सौंदर्य रचून जो विधि तुला दिव्यत्व दे यापरी,
आला राग तुला तरी कर गडे फिर्याद त्याच्यावरी
अर्धोन्मीलित जो गुलाब अलकीं आहेस तूं घातला
अन्तर्भाग जयांतला दलभरें अर्धा दिसे झांकला—
कोणी पुष्पसखा द्विरेफ रसविद् येईल त्या मोहुन;
गूढें जीं हृदयांत तीं उकलण्या येथें वसे हा जन!
ओंठाच्या मिटल्या कळ्या उमलतां ही दंतमुक्तावली
हो एक क्षणमात्र विस्फुट परी लुप्ता पुन्हा जाहली!
तैसें जे हृदयांत भाव वसती, उत्फुल्ल ते व्हावया—
होत्ये जों सुरवात, तोंच फिरुनी जाती विरोनी लया!
मी येथून सुलोचने! तव लिहीं काव्यें कपोलांवरी
त्यांचे गोड ठसे तिथें उमटणें केव्हां कळेना परी!

५

माझें प्रेम तुझ्यावरील, रचिलें नाहीं विचारावरी—
बाळे ! किंबहुना, मदीय कथितें बुद्धी मला वेगळें !
मी संध्यासमयीं, विषण्णमनसा निःशब्द वेलेवरी—
बैसें शोधित यापरी तुजकडे कां चित्त ओढे बळें ?
लाटेच्या फुटल्या कडेवर पडे चंद्रप्रभेची छवी,
तेथें रंग अवर्णनीय रजत प्रक्षुब्धता दाखवी.
अर्धी लाट लपून गूढ तिमिरीं, अर्धी प्रकाशीं खुले—
त्या ऊर्मी-सम या मदीय हृदयीं त्वत्प्रेम हेलावलें !
प्रीतीचा लवमात्रही तव हृदीं नाहीं मनीं भावना—
ऐसें स्पष्ट न जोंवरी कथियलें तूंच स्वयें या जना;
मूर्ति प्रत्यहिं तोंवरी जिवलगे ! दावूनियां लोचना
चालूं ठेविन मी अशीच मधुरा माझी मनोवंचना !
आहे संभ्रम जोंवरी मम हृदीं आशानिराशास्पद
उत्कंठा सुखवी मनास म्हणुनी, 'हो' 'ना' कधीं ना वद !

६

गेली काव्यकला मला त्यजुनियां शब्दौघही आटले,
रोगें जर्जर हो तनू, अपयशें चित्तास वैकल्य ये;
सुश्रूषापटुता स्वभाव धरुनी तें दाविली तूं, सये !
आणि प्रेमवचीं पुनः पुनरपी मातें समाश्वासिलें.
चित्तीं राज्य करी विषण्णमयता श्रीशारदा कोपतां—
मत्खेदास तदा स्मितें दुरविशी अंधार जैसा रवी,

आतां या मम भाग्यकालिं तुजला कां ये उदासीनता?
हृद्रोगें बहु पीडलों नच दया आतां तुला ये कशी?
चित्ताला रिझवावया नवनवी जी योजिली चातुरी,
किंवा अप्रिय औषधां मधुरुची देशी स्मितें जी, गडे!
येते ती स्मरणीं, न दर्शन परी प्रत्यक्ष तूझें घडे
संपत्ती यश हीं तुझ्याविण मला गे! कालकूटापरी.
प्रेमाला जर कां असेल भरती आपत्तिकालीं तरी—
व्हावें भाग्य कशास? प्रेमजननी लाधो विपत्ती बरी!

७

जेव्हां हर्षभरें पिता तव कथीं झालीस वाङ्निश्चिता
तेव्हांपासुन या असे धडकली चित्तांत माझ्या चिता;
आम्हां सर्व कलाभिदां वगळुनी सामान्य कोणीतरी
व्हावा प्रेमनिधान, धन्य रसिक, आहे तुझी चातुरी!
आतां अश्म-कठोर चित्त मम हें झालें असे राजसे!
कांहींही वदलीस तूं कटुतरी साहील तें साहसें,
बाले, अश्रु कशास व्यर्थ अधुना हे आणिसी लोचनीं
देई हांसुनिया निरोप सरता तूं या जना लागुनी!
मातें विस्मर तूं, स्मरो न तुज मी, त्याची न आतां क्षिती
कांहीं अर्थविहीन शब्द म्हणुनी बोलूं नको संप्रती;
अश्रूदूषित मानिनी! नच करी हें स्वल्प सौख्यक्षण—
माझें अंतर ठाउकें तुज असे; जाणीं तुझें मी मन!

पृथ्वीची जडता जडून बनलें निःसत्त्व हें जीवन
बाले ! त्या विसरावया, कर चिर-स्मर्तव्य संभाषण !

८

जा येथून निघून दूर; अगदीं सोडा मला एकटा,
कोणीही असलां तरी न मजला पर्वा तयाची मुळीं,
दृष्टीच्या पुढतीं न ऐहिक अतां कांहींहि आणा छटा—
कां कीं प्रेम-विडबनेस पडला हा जीव आहे बळी !
डोळ्यांनीं लवलाजुनी मुरडुनी, हांसून कोण्या मिषें—
तें नाना परि चित्त भाव अपुले जे दाविलेले तसे;
आतां ये कळुनी निसर्गसहजा होत्या तुझ्या त्या
कृती,
झालें जीवन सार्थ पाहुन असें मीं मानिलें ज्यांप्रती !
सोनेरी किरणें पिकें खुलति तों अभ्रें तयांच्यावरी—
यावीं; आणि सुकून शेत सगळें जावें सबाह्यांतरीं
तेवीं हृत्क्षितिजीं त्वदीय कृति ही चिंतांबुदा आणिते
आशेची मनिं बाग जी बहरली ती यामुळें कोळते !
मोत्यांची बरसात त्यांतुन अतां होईल जों वाटलें—
आगीचा सखये ! अचानक कसा पाऊस तों कोसळे !

९

वर्षें आजवरी जगांत क्रमिलीं दुःखेंसुखें भोगुनी;
दृश्यें दृष्टिपुढून तीं सरकतां ये नीर मल्लोचनीं

छाया आणि प्रकाश यांमिळुन ये चित्राप्रती चारुता
एकाचाहि अभाव तेथ असतां कैशी घडे पूर्तता ?
चेतोवृत्ति मरे, तरंग मनिंचे मोकाट वाऱ्यावरी,
बुद्धी भेसुर गीत गात बसली, आशा पिशाचीपरी
गेले रंग उडून, मात्र उरल्या अस्पष्ट खाणाखुणा;
गेलें झाड वहून, त्या टवटवी येईल कैशी पुन्हा ?
देठापासुनियां तुटून पडतां तेथें पुन्हा जाउन
राहावें बिलगून का धरितसे इच्छा फुलाचें मन ?
इच्छा आणिक पूर्ति भिन्न नसती, भूस्वर्ग होती तरी;
आहे व्यर्थ विचार सौध रचणें नानापरी स्वांतरीं !
आतां मी जगतार्थ मात्र जगणें; माझें न कोणी जरी;
गाणीं सस्मित गात जेविं डुलती पुष्पें समाधीवरी !

## १०

होते आग हृदीं, कधीं प्रकटते या तीव्र इच्छा मनीं—
ताडाया तुजला कठोर वचनें नानापरी बोलुनी;
जिव्हाग्रीं कटु शब्द तो परि विरे, होते मती कुण्ठित,
येतां श्रांत, विषण्ण तूं मजपुढें चिंता समुत्कण्ठित !
बिंबे तुंबळ भावसंगर जधीं चित्तांतला लोचनीं,—
जेव्हां गूढ मनांतलें लपविसी कांहींतरी भाषणीं—
होतें तें करुणार्द्र चित्त मम, त्या पाहून बाले ! कृती;
केला तूं स्वजनार्थ त्याग मम, तो देवो तुला सुस्थिती !

देऊं दोष कशास मी तुज बरें, प्यादीं विधीच्या करीं–
आहों आपण मानवें; निजसुखें तो स्वैरक्रीडा करी !
जेव्हां दैव-विधान भिन्न असतें इच्छेहुनी मानवी—
तेव्हां सस्मित साहणें सहज तें; ही आपली थोरवी !
आहे विस्तरलें अफाट पुढती, हें विश्व मी त्यांतुनी–
कांहीं काढुन काम कण्ठिन दिलें, कष्टी न तूं हो मनीं !

# अमरपंथाचा यात्रेकरू

[ गुर्जरकवि न्हाणालाल दलपतराम यांचे कवितेवरून ]

१

अमरपंथिचा यात्रेकरु तो
जीवनमार्गावरुनी जातो,
आयुष्याचा उतार उतरुनि—
अगम्य दिशिं फिरतो !

२

असत्-सताच्या तमःप्रकाशीं,
रजःकणांच्या उठती राशी,
अवगुण्ठुनियां भूस्वर्गांशीं—
विश्वसुंदरी शाल जणूं घे—
श्वेतश्यामलाशी !

३

प्रयाण दिसतें दूर बहू तें—
वाट तेथची पुढें भासते
सुरगंगेची पडछाया ते,
दिक्काल वना विंधुनि जाते
जन्मान्तरिंची पायदळी जणुं
पुढती विस्तरते !

४

धवलत आहे निशा भोंवतीं
त्याच्या जीवन देशासम ती
तिमिरा उजळी तेजःकांती
विरल तमें अवगुण्ठित धरिती
झाली वाटे चमकुनि उठती—
यात्रेकरुच्या पदघातें वा—
वाट विराजे ती !

५

तपोवनींचा दिसे तापसी
ब्रह्मरंध्रिची तेजोराशी,
साधुत्वाची चंद्रिका जशी,
अघअनघांची स्कंधीं पडशी !
अनुभव, भविचा भार झेलुनी
कंबर गेली कमान बनुनी,
स्नेही गेले पुढते निघुनी,
साथी येती दूर मागुनी;
संगें नव्हता कोणी स्नेही
नव्हता किंवा सांगातीही !
वठलेला वट विजनीं एक
पडला होता दावित धाक,

निःशब्दाचे अनुदित नाद
त्यांचा तेथें ये पडसाद;
मार्गी पडती मंद पाउलें
होते अध्वश्रम बहु झाले
पुष्पपल्लवीं विहिन वृक्ष तो
सुरकुतलेल्या पथिका हंसतो,
जुनाट तरुचें शुष्क खोड तें
विजनामध्यें पडलें होतें,
मार्गावरुनी डावलुनी तें
शिशिर ऋतूंतिल खोड मानवी
तेथें संचरतें!

तेजच्छायांनीं भूवरते
मंत्र गूढ जे लिहिले होते
एक दृष्टिनें उकलायातें
स्वजनशून्य तो एकाकी नर
धुंडी विजनातें!

लुप्त होउनी एका जागीं
प्रकटे गगनीं अन्य विभागीं
मावळत्या चंद्रासम चाले
नर तो निजमार्गी!

६

सभोंवतालुन दृष्टी वळवुन
चालतसे तो निज मार्गांतुन
अनंतांगणीं एक विचारें
जाई तो निघुन.

७

वरतीं नमला चंद्र अंबरीं
शांत चंद्रिका भुवनीं पिसरी
पीयूषाच्या अभिषेका जणुं—
भूवरतीं वितरी !

८

अतल सरोवर दिसतें पुढतीं
रम्य कुमुदिनी त्यांत हांसती !
आनंदानी खिदळत डुलती—
अशा शिशूंचा नयननीलिमा
नाचे ज्यांवरतीं !

९

गहनतांगणीं आकाशांत
मेघखंड लघु एक क्रीडत;
मधुचंदेरी किनरी मिरवित;

सुरनौका जणुं अगाधांतुनी
उतरे डौलांत!

१०

आयुष्याचा उतार उतरुनि
अमर-पंथिची यात्रा करुनी
अगम्यतेच्या उदरीं जन्मुनि
अगम्य अटवीमध्यें यात्रिक
जाय कुठें निघुनी!



# मोहिनी !

सहवासीं सखये ! तव पडत मोहिनी
बोजुनि ये वदण्या तें जाइ राहुनी ! ॥ ध्रु०॥

स्फुरति जरी ओष्ठपुटें
तरि न मुळीं शब्द फुटे
शंकेनें जीव हटे
याच भामिनी ! १

नाजुक मम चित्तभाव,
अपुरें परि शब्दविभव
रुचतिल का हृदया तव
मंजुभाषिणी ? २

गूढें जीं गोड, खोल,
मति करिती अति विलोल,
त्यांना तव नयनगोल,
घेति खेंचुनी ! ३

हृदयीं जे थरथरते
भावबंध नवथर ते
वदतां मधिं वच विरतें
मुग्ध होउनी ! ४

असतांही म्हणुन, सखे !
ऐकण्यास जीव भुके,

राहुनियां प्रेम मुकें,
जाइं परतुनी ! ५

परि फिरुनी तूं नसतां
मम हृदयीं विरहार्ता,
शब्दांची नव सरिता,
येइ दाटुनी ! ६

असला हा गूढ खेळ
नलगे त्या काळवेळ
त्याला नच ताळमेळ
घातला कुणीं ! ७

# हरपला दुवा

नियंता जगाचा, वृद्धीचा आधार
हेरीतो शिकार नरनारी !

पण्डित प्रवीण मुनि महामानी
यानें एका गुणीं गोवियेले !

जीवनशक्तीची सोनेरी शृंखला
नांव 'प्रेम-लीला' तिला जगीं !

देश धर्म याती, यांची नाहीं चाड
बैसतां पकड सांखळीची !

२

ऐशी कोणी एक युवती युवक
गोंवलीं नाजुक प्रेमपाशीं

नेत्र हृदयांची जाहली जुळणी
संसृतीचीं झणी दास झालीं

साध्य तें साधलें, परी मनांतली
हुरहुर मेली नाहीं त्यांच्या

ज्ञाताच्या पल्याड भावगम्य कांहीं
जीव ओढ घेई त्याच्या पाठीं

बाहू आलिंगितां ओष्ठ चुंबे घेतां
नेत्रें न्याहाळितां आशंका ही

'जीविताचा गोफ गुम्फितांना तर—
एकादा पदर चुकला ना?'
हृदयाला तृप्ती लाधेना क्षणैक
चित्त पर्युत्सुक सुख-सर्गी !

३

जीवनशक्तीचा न्यायाधीश न्यायी
सहास्य तो पाही कौतुकानें
मातृपदीं चढे पत्नीची पुण्याई
नवी नवलाई जन्मा आली
कल्पनेच्या स्वप्नीं अभावीं चित्रिलें
मूर्त तेंच झालें बाळरूपें !
निर्मल प्रेमाचें आपुल्या प्रतीक
रम्य कन्यामुख न्याहाळितां—
रंगलीं अन्तरें मग दांपत्याचीं
निवाली मनींची हुरहुर !
हरपला दुवा लाधला माघारा
जीविताच्या हारा पूर्ति आली !

# सांत्वन

ये बैस लाडके ! मजजवळी ॥ ध्रु० ॥

सहानुभूती शून्य जगीं या
वण वण फिरसी कां तूं वाया ?
विफल श्रमविसि कोमल काया
वृथा निराशा पदरीं पडुनी लाभ नसे तिळ मुळीं. १

क्षुब्ध गारसे वारे सुटले,
अशुभ सुचविती घुबडें कोल्हे,
स्वैर चालवी पिशाच चाळे,
मांगल्या या समयीं थारा नाहीं या भूतळीं. २

रंगी बेरंगी वस्त्रांनीं,
नटुनी फिरती तुझ्या मैत्रिणी,
तिरस्कारिती परि तुज हंसुनी
जाउं नको तूं कधीं त्यांमधीं; त्या थोरांच्या मुली ! ३

उपहासें तुज कुणी टाळिती,
आदर वर वर अन्य दाविती,
एक भाव हा परि तच्चित्तीं:
कीं तज्जगतीं तुझी योग्यता तिळही नच राहिली ! ४

तुज इतरांचें भाग्य न बाले !
हीन दीन तूं द्रव्यकुलबलें,

मोहक नच तव रूप शोभलें—
काळसावळी होशिल केवीं प्रिय तूं भोळी खुळी ! ५

दारिद्र्याचे लेख लिहियले—
जरि मम भाळीं विधिनें असले—
त्वत्प्रेमें तरि हृदय दाटलें—
अन्तर तुजला म्हणुन मरेतों कधीं न देइन मुली ! ६

पानामागें कळी कोंवळी
तशी लाडके तूं या कालीं—
मातृप्रेमावरणाखालीं—
खुशाल पहुडुनि रहा काळजी हृदयीं कां लागली ? ७

रूप गुणां तव पुरें खुलूं दे
मन्दानिल मधु गंध हरूं दे
सद्रसिकां डोलूं दे मोदें—
सहृदय कोणी करील तुज मग धारण कण्ठस्थलीं ८

# लोकमान्य टिळकांस—

साधी, श्यामल, सान, मूर्ति तव ती दृष्टीपुढें ठाकतां—
झालेले मृतवत् सहर्ष उठले तैं हिंदभू-सेवक
राष्ट्रा मंत्र तुवां तदा शिकविला सत्स्फूर्तिचा प्रेरक;
साजे, श्रीतिलका! तुला बिरुद तें 'अस्वस्थतेचा पिता'
आला पूर अतां मतांस, जनता हो मोह व्यापादिता;
कीं भासे प्रलयावधी प्रकटला ब्रह्माण्डविध्वंसक;
जेवीं स्थापित सुस्थिति प्रलयिं त्या ॐकार उद्‌बोधक;
तेवीं येउन भारतीं स्मृतिमिषें, संस्थाप राष्ट्रैक्यता!
ते सामाजिक राजकीय असले आतां नको मागुती—
येण्या शुष्क विवाद; त्वत्स्मृति-दिनीं सन्देश लाभो नवा,
स्फूर्ती निर्झरिणी मुकी तव गिरा ऐकून हिंदी युवा
मृत्यूला दरडावुनी मग रणीं टाकील तो पाउल;
चारित्र्यें विमलें, यशें सुधवलें, पायीक हे भारती
येथें नांदवितील न्याय, समता, स्वातंत्र्य दिव्योज्ज्वल!



# " कां नच वदलिस तसें ? "

आक दुजा जर दिलीस तर मग कां नच वदलिस तसें ?
राजसे ! कां नच वदलिस तसें ? ॥ध्रु०॥

सुभाषितांचे पढिक बोल तव, मोह पाडिती मना—
मोहिनी मोह पाडिती मना;
सत्य सृष्टिचा सहज सूर मज गमला नीरस जुना !
सारिके ! गमला नीरस जुना !
मनांत भीती कथितां होईल जनांत अवधीरणा
म्हणोनी कथिलें प्रेम न कुणा !
सद्रत्नाला, तुला जोड मी होइन कोंदण असें
चिंतिलें मनांत मनिंच्या असें !

२

"पौरबालिका तुला खुळ्या ! ती पाडिल भलत्या फशीं
पाडसा ! पाडिल भलत्या फशीं !"
माय प्रीतिनें सांगत होती गोष्ट हिताची अशी;
भीतिनें, गोष्ट हिताची अशी !
विसंबुनी परि तुझ्या स्थितीवर म्हटलें तिजला पिशी ।
चतुरिके ! म्हटलें तिजला पिशी !
आशापूरित तरुण मनाला हृदय आइचें कसें
कळावें हृदय आइचें कसें ? ॥

कां नच वदलिस तसें ?

३

दाटे धुक्याच्या बुरख्याखालीं निसर्ग लपवी जशी ;
सृष्टिची खळबळ लपवी जशी—
मुग्ध मनाची हुरहुर माझ्या हृदयीं दडली तशी
प्रीतिची हुरहुर दडली तशी !
नैराश्याची निशा उजळण्या इष्ट सिद्धिचा शशी
उद्या येइल आशा अशी !
तोंच अकल्पित अनपेक्षित ये भलतें कानीं कसें !
चंचले ! भलतें कानीं कसें ! ॥

४

आवडनिवडी तुझ्या बघोनी रचिली नानागुणी—
सुहासिनि ! रचिली नानागुणी
बाग दिलाची सुकून गेली; तुझ्याविणें ती सुनी
मानिनी ! तुझ्याविणें ती सुनी
जनरीतीनें जरी तिला ये धनीण दुसरी कुणी
तरी ती तुझ्याविणें ग सुनी
कण्टककुसुमें, प्रकाशछाया यांविण जीवन नसे-
शिकविलें तूं मज हें राजसे ! ॥

# प्रतीक्षा

दो नयनांची अचल लावुनी अवकाशीं रोखणी—
पाहत्यें वाट तुझी निशिदिनीं;

गडगंज सम्पदा भरली आहे इथें,
कितितरी स्थानही पडलें आहे रितें,
तरि आप्त-जनां मी अडगळशी वाटत्यें,

जीवितनाथा ! आतां मज हो माहेरीं जाचणी,
येउनी झडकरि न्या येथुनी !

२

नयनीं गोळा प्राण जाहले, क्षणा क्षणा मोजुनी—
प्रतीक्षा करित्यें तव बैसुनी;

केधवां कोठुनी अवचित तूं येशिल,
कल्पना न याची मजलागीं बिलकुल,
या प्रलय-मारुतीं ऐकुं नये चाहुल,

दिनरात्री मी म्हणुन कण्ठित्यें आलोचन जागुनी—
ना तरी जाशिल कीं परतुनी !

३

माझ्यासाठीं विलंब नच हो म्हणुनी शृंगारुनी—
बैसल्यें काया या लागुनी,

होउनी शुभ्र-शुभ नाजुक वसनावृत,
वधुवेष लेवुनी वाट तुझी पाहत,
मी काल कण्ठित्यें वस्त्राञ्चल मोजित,
किती यापरी दिवस दवडिले गणती नाहीं मनीं—
परि न तूं येशी जीवितधनी !

४

शिणगाराचा नूर चालला हळुहळु मम उतरुनी—
गेलें चम्पकसुम वाळुनी;
पाहुनी वाट तव डोळे मम भागले,
कीं गुलाब गालीं करपुनियां चालले,
औत्सुक्य भेटिचें हृदयिं अमित दाटलें,
दीन-सहाया ! निज यश-वसनीं घ्या मज अवगुण्ठुनी
विरूंद्या मजसि दृढालिंगनीं !

५

दिशादिशांना व्यापुन वसमी गमतें चोहींकडे,
परि न तव दर्शन नयनां घडे;
तव चरणधूलि मज दिसते संध्या तमीं,
सळसळति हवेंतुन तव वसनें रेशमी,
येशील आज ही ऐकियली बातमी,
दिन-रजनीच्या मधुर संगमीं, गूढतमीं येउनी—
न्या मज वारुवरी बसवुनी

# " नदीतीरीं—"

नदीतीरीं वनप्रांतीं दिनान्तीं एकदां झाली-
तुझी माझी सखे ! भेट, एकदां मात्र त्या काळीं
कोण तूं, ना विचारीलें; कोण मी, बोललों नाहीं;
सांगुनी, ऐकुनी ही का माहिती ज्ञान हो कांहीं ?
स्वल्पशा कीटकाचेंही व्हावया साङ्ग विज्ञान
मानवा लागतिल घ्याया शेंकडों जन्म मागून !
कशाला मी तरी सांगूं, विचारूं वा तुझें नांव ?
भेटलों, वैसलों, गेलों; जिथें राहूं तिथें गांव !
स्वमार्गें तूंहि गेलीस; मला माझें असे काम;
अशीं हीं स्वल्पसहवासक्षणें जीवास आराम !
सहारा जीवनाचा, त्यामधूनी अल्प ओलावे
असे येतात सर्वां; मीं कशाला व्यर्थ बोलावें ?

२

नदीतीरीं तिथें दोघें उंडिणीच्या रुखाखालीं
तरंगीं काव्यरंगांच्या, मुक्यांची बोललों बोली;
हिरवळे दाट शेवाळें नदीचें खोल जल काळें,
उन्हाच्या एक किरणाचा कवडसा त्यावरी डोले !
तरंगे ऑंड पाण्यांत संथ त्या एक डाहाळी-
जाड काळीं जिचीं पानें सारखीं होत वरखालीं !

सुरंगी इन्द्रचापाला लाजवी तळपतां डौलें
गण्यापक्षी जळीं लक्षी झषांचे चालले चाळे !
करीं माझ्या तुझे हात, त्यांवरी लावुनी दृष्टी
बसूनी तेथ निःशब्द, जगाच्या विसरलों गोष्टी !
बैसतां यापरी तेथें, बोलल्यावीण शब्दांस-
उरे कोणास जाणीव किती गेले घटी तास !

३

तुझ्या माझ्या ह्रर्दींच्या गे, ऱ्हर्दीं कांहीं तरंगे का
संथता त्यामुळें त्यांची असे का पावली धोका ?
पाहुनी डोह डोळ्यांनीं कशी त्याची कळे खोली?
ह्रर्दींचे गूढ उकलाया, शके का मानवी बोली ?
मनींची खोल गूढें जीं तुझीं माझीं स्वसंवेद्य
तयांचा स्वल्प लक्षांश शक्य होईल का वद्य ?
अवस्था ही समाधीची, कलेला ना तिथें स्थान,
नाद ना, अर्थ ना, ऐसें प्रीतिच्या गीतिचें गान !

४

एकदां मात्र झालेली तुझी माझी कुठें भेट;
तरी तूं दाविशी मातें कवित्वीं नित्य नव वाट !
जगाच्या काव्यव्याख्येला टिके ऐसें जरी एक
नसे कांहीं तुझें गीत; तरी तूं श्रेष्ठ कवि मूक !

अकर्त्री तूं, परी होशी सदा मत्स्फूर्तिची मूर्ती,
तुझ्यापायीं मला कीर्ती, अशी न्यारी तुझी रीती !
जगाला जागवायाला नभीं ज्या उजळल्या ज्योती,
तिथें जाऊन तारे ! तूं स्वतेजें शोभशिल अंतीं !
नसे इच्छा मला त्याची; बरा मी येथ खद्योत,
नसे निस्सीम मत्तेज, चिमुकलीशी मम ज्योत,
तिच्या अल्प प्रकाशानें तुझीं जीं मूक गीतें तीं-
कराया व्यक्त शकलों मी, तरी हो धन्य मन्नियती.



# विरक्ताचे उद्गार

पदतलीं कठोरे! खुशाल चुरडीं हृदय
कीं घाली जिव्हारीं कटु वचनांचे घाय;
मी स्वस्थ बसोनी साहिन तूं जें करिसी
मी कशास येऊं तुजसी अडवायासीं?

हृदयांत फुले जी पूर्वी आशावेली
हिमशीत दृष्टीनें तव ती सुकुनी गेली,
एकेक पाकळी गळुनीयां मातीला—
केव्हांच मिळालीं पुष्पें; तव या लीला

यापुढें नांवही वदता तव मम वाणी—
होइल ऐकण्या जगतीं शक्त न कोणी!
तूं चालिव अपुले खुशाल आतां छंद
मी निघून चाललों जर तो तुज आनंद!

२

"हृदयांत फुलें जीं मानी माझ्या झालीं—
त्यांतून उगवल्या पुनरपि नूतन वेली;
ते लताकुंज मम प्रीतिसमाधीभवतीं;
रचितात सुगंधी गीतांची फुलवंती!

पाहून तियेला डोलावें रसिकांनीं—
परि कुणा कळे तिज कसलें दिधलें पाणी!

तें रहस्य मनिंचें कोणा नच कळणार
होईल मनाला परि तव साक्षात्कार !
ही उरली एकच आशंका मम चित्तीं,—
कीं कधीं फुलें तीं पडतिल जर तव हातीं
तर तयां पुनरपी करिशिल कां तूं चूर ?
होईल पदतलीं तुडवाया का धीर ?

३

" छेः ! तसें कधींही नाहीं होणें तेव्हां,—
मद्गीत सुमें तुज होतिल हृदय-विसावा !
येईल पाहतां तीं तव नयनीं पाणी,-
धरशील तयांना हृदयीं तूं कवळोनी,
म्हण भलीं बुरीं त्यां कांहीं लोकांसाठीं,
परि तुझें खरें मत अडेल गे तव ओष्ठीं,
मम मृतप्रीतिचें स्मारक माझें कवन—
पडतील त्यावरी मग तव अश्रू दोन.

# समुद्रकिनाऱ्यावर—

क्लान्त वपूला श्रांत मनाला शांत कराया जरा
सायंसमयीं सोडुन येथें आलों अपुल्या घरा.
गाढ तमें परि परिवेष्टित मी एकाकी या स्थलीं,
विषण्ण चित्तें पुलिनीं पडुनी रचीं विचारावली.
उणीव कसली नसे तरीही चिंता जाळी मला,
न कळे हृदया काय बोंचतें जीव कसा पोळला;
परी कशानें तें उमजेना, केविलवाणी स्थिती
मुक्या मनाची अशी त्यामुळें होत असे मागुती !

२

काळा बुरखा काळोखाचा प्रचंड दैत्यापरी—
घट्ट लपटुनी अंगावरती सागर हा पांघरी.
अंधारामधि क्षणांत लपुनी क्षणांत घेतां उशी,
गरगर फिरते दीप चमकती नेत्र लाल राक्षसी !
क्षुब्ध सागरीं नदी-मुखान्तरिं तुफान मौज्यांवरी,
नस्तामधुनी निजभुज-वेगें निषाद नेती तरी.
फुगा शिडाचा नांव नाचवी डोंगर लाटेवरी,
क्षणांत अस्मानांत फेकुनी क्षणांत दावी दरी.
धरी नाखवा करीं सुकाणू भिर भिर भवऱ्यांतुनी,
धडकत चाले लाटांसंगें नाव जळांतुन जुनी.

३

धवल सैकतीं पडलों होतों धडधड काळिज करी,
वाऱ्यावरुनी वहात आले स्वर तों कानांवरी:
"भलर मर्दानूं! समिंदराचे बच्चे आपुन् खरे,
जलवंतीनें काय करावे नखरे तुमच्या झोरे?
धरा नेटानें जम्ना बाजुला वल्हें, संभाळा वरा,
भल दादानूं! वल्हवा हिम्तिनें, राया खिन्भर
दम्धरा."

४

जागृत करि हा रव मम हृदयीं आशा इच्छा पुन्हा
तरंग लहरी अगणित उठल्या चैन पडेना मना,
मऊ मख्मली पुलिनीं पाहे प्रज्ञा मम गत सुखें,
विफल-परिश्रम विषण्ण हृदयीं दाट दाटलें धुकें,
परि हृदयाच्या जलधिक्षितिजीं दूर कुठे एकली
अस्फुट आशा-किरण-शलाका दिसे मना बिंबली
ती ध्रुव तारा मम जीवाची दृष्टि तिथें रोखिली
दुर्बळ नौका जीवन-कलहीं म्हणुनी मम लोटिली!

# " खिडकींतुन— "

ये सख्या ! इथें बैसुन
पहा या क्षणैक खिडकींतुन
हीं दृश्यें निरखुन
येथुनी बघ या खिडकींतुन;
नभाच्या अफाट फलकावर
पार्श्वभू बहुरंगी सुंदर
आलेख मनोहर मेघांचे जीवर
छान सानसा अंश तियेचा दिधला मजलागुन
पहा, तो नीट सख्या निरखुन !

२

या नील नभोमंडळीं
अस्फुट यक्षपुरी रेखिली
धरुनी सुफलावली
डोलती बघ पुढती नारळी
स्वदेहें बाळांवर सावल्या—
कराया वात्सल्यें वांकल्या,
ऐक या सळसळती झावळ्या,
अविरत त्यांची मर्मर ही का हुरहुर हृदयांतली
जशी मी कण्हतों ही आपली ?

३

या चंपकशाखेवरी
झुले बघ ही कलिका सुंदरी
ही सौरभ-सुख-मंजिरी
कशी बघ हलते खालीं वरी !

हृदींच्या कटु-मधुरा भावना-
करोनी मुग्ध जशा नर्तना
दुखविती संतत माझ्या मना
तशा जाळिती तिच्या जिवाला बहुधा कांहींतरी
दिसेना चैन तिला अंतरीं !

४

त्या दूर दिगन्तान्तरीं
तरंगत भुरक्या ठिपक्यांपरी
या अथांग नीलाम्बरीं
दिसे का अन्धुक कांहीं दुरी ?

ते विहंगमांचे थवे
उडोनी जाती भलत्या जवें
जणुं विचार माझे नवे
मच्चित्ताच्या छाया पडल्या दिसती मज त्यांवरी
ओढतें अन्तर कोठें दुरी !

या इथेंच मी पहुडुनी
पहातों हेंच सदा निरखुनी
अनिमीलित लोचनीं
सारखें हेंच बघें अनुदिनीं
सहकंप अम्हांमधिं वसे,
तो शब्दांविण कळतसे
उपचारा भावीं दिसे,
दीडवितीच्या खोलीमाजी म्हणुन जगा विसरुन
गुंगतों पहात खिडकींतुन !

मुंबई, १।२३ आंग्रेवाडी.

३

या चंपकशाखेवरी
डुले बघ ही कलिका सुंदरी

ही सौरभ-सुख-मंजिरी
कशी बघ हलते खालीं वरी !

हृदींच्या कटु-मधुरा भावना-
करोनी मुग्ध जशा नर्तना
दुखविती संतत माझ्या मना

तशा जाळिती तिच्या जिवाला बहुधा कांहींतरी
दिसेना चैन तिला अंतरीं !

४

त्या दूर दिगन्तान्तरीं
तरंगत भुरक्या ठिपक्यांपरी

या अथांग नीलाम्बरीं
दिसे का अन्धुक कांहीं दुरी ?

ते विहंगमांचे थवे
उडोनी जाती भलत्या जवें
जणुं विचार माझे नवे

मच्चित्ताच्या छाया पडल्या दिसती मज त्यांवरी
ओढतें अन्तर कोठें दुरी !

या इथेंच मी पहुडुनी
पहातों हेंच सदा निरखुनी
अनिमीलित लोचनीं
सारखें हेंच बघें अनुदिनीं
सहकंप अम्हांमधिं वसे,
तो शब्दांविण कळतसे
उपचारा भावीं दिसे,
दीडवितीच्या खोलीमाजी म्हणुन जगा विसरुन
गुंगतों पहात खिडकींतुन!

मुंबई, ११२३ आंग्रेवाडी.

# सहल—

सुवर्णाच्या निष्कासम रवि पयोधींत डुबला,
नव्या आयुष्याचा प्रथम दिन आतां उलटला,
समुद्राचें पाणी पिवळसर लालीमधि खुले,
गमे जागोजागीं हिरवट निळे रंग भरले!

इथें तूं, मी, आलों सहल करण्या आज पुलिनीं,
समुद्राला भेटे प्रमुदित मनें जेथ धरणी
नसे प्रेमालापां क्षणभर तयांच्या खळ, गडे!
कसें ऊर्मीरूपें हृदय उभयांचें धडधडे!

अनंताचा साक्षात् प्रतिनिधि प्रतीकात्मक असा,—
वसे या बाजूला जलधि; जड या बाजुस रसा;
महा भूतांच्या या पळभर मधीं राहुन उभे,
करूं आयुष्याचें मनन अपुल्या आज, सुलभे!

पुरा जें प्रीतीचें उभय हृदयीं बीज पडलें,
विवाहानें त्यातें सुदृढतर नातें जडविलें;
अवस्था या दोन्ही परिणत जिथें होत सहसा;
असे हा आतांचा सुखद शुभ संध्याक्षण असा!

२

खरे आयुष्याचे विलग असतां ओघ अपुले,
विधीनें एकत्वीं सहजच तयांतें मिळविलें;

विवाहानें झालों निकटतर बाले ! निगडित,
म्हणोनी या कालीं परिचय मनांचा अभिमत !
तुझ्या इच्छा मातें वद; परिस माझ्या अभिरुची
रहस्यें ये सांगूं, निज विगत-संदेह मनिचीं;
रहस्यें जीं हास्यें उमलुन निमालीं गत दिनीं,
नवोढे ! तीं सांगूं हृदय हृदयाला मिळवुनी !
तव स्पर्शें माझ्या नवथर सुखें नाचति मनीं,
सखे चालूं दोघें हळुहळु अतां क्लिन्न पुलिनीं;
मला गुंफू दे गे, तव कटिसभोंतीं मम कर,
करूं ये या स्थानीं मधुर गुज गोष्टी सुखकर !

३

तुझ्या ठायीं कोणा अजवर कधीं जे न दिसले
असे या दृष्टीला तव मम मनोबंध कळले,
अपेक्षा, आकांक्षा, हृदयिं मम ज्या नित्य वसती,
मला त्या साधाया सुकर तव साह्यें; मधुमती !
हवेमाजी ज्या मीं असतिल हवेल्या उठविल्या,
कधीं त्या दुर्दैवें जरि न मजला साध्य ठरल्या;
नको होऊं देऊं तरि अपयशें चित्त विकल,
मिळे कर्तव्याचें सुख न जरि लाधे श्रमफल !
नभा आलिंगाया निज भुज उभारी जलनिधी
प्रयत्नां सोडी ना, यश न जरि लाभे तिळ कधीं;
तशीं ध्येयें कांहीं ! असति निज उच्चैस्तर तयां,–
झटूं साधायाला; नच अपयशाची धरूं रया !

४६२३

४

न देवा-धर्माचा प्रचलित मला आदर मुळीं,
तरी ध्येयें माझीं विमल असती खास सगळीं;
तुझ्या स्वातंत्र्याला नच मम मतें बाध करिती,
कधीं माझ्यासाठीं त्यज न निज वैय्यक्तिक मति !
न दासी, ना देवी, तुजसि म्हणणें संमत मला,
जगीं मानुष्याची अधिक महती होय विमला;
सखे या जीवाची सतत अससी तूं सहचरी—
न हें नातें येतें, लव विषमता राहिल तरी !
इथें विद्याभ्यासा करुन उभयीं जें मिळविलें—
जगानें जें कांहीं अनुभवमिषें वा शिकविलें—
तयांच्या संयोगें प्रगतिमय हें जीवन करूं-
धरूं निष्ठा तत्त्वीं, सुहृद सखयां सौख्य वितरूं !
मला शब्दें यावी अवचित तुझ्या स्फूर्ति अमल,-
दिगंतीं मीं न्यावा मग तव गुणांचा परिमळ,—
वसे जें अन्योन्यीं अविहित तया दूर करणें—
असें राहो येथें, सुचिर अपुलें पूरक जिणें !

REFBK-0004723
REFBK-0004723